महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित
वाणिज्य विभाग, प्रकाशगड - ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) , मुंबई -५१
फोन:(वै) २६४७२६४५ (का) : ६४७४२११: फॅक्स २६४७८५४४

क्र.मु.अ(वा)/लेखा/ग्रां.प.दिवाबत्ती/५५/२००६-०७/ No 17175 दिनांक- 07 APR 2007

परिपत्रक क्र. ६०

विषय:- ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्य च्या वीज बीलांची रक्कम देण्यासाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. दहा कोटी अठरा लाख बत्तीस हजार फक्त.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.बीजीटी २६०६/प्र.क्र.४१६३/परा-४(२२) दि.२८ मार्च २००७.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ५३ दि. २०.९.२००६.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ५५ दि. ०५.०१.२००७.

ग्रामपंचायतीच्या हददीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची देयके भागविण्यासाठी शासन १०० टक्के अनुदान देते. सन २००६-०७ या वर्षाकरीता अर्थसंकल्पीय तरतुद केलेल्या रक्कम रुपये १२०.७२ कोटी पैकी ११०.५४ कोटी रुपये इतकी रक्कम वरील संदर्भिय क्र. २व३ नुसार आपल्या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. तसेच आता रुपये १०,१८,३२,०००/-(रु. दहा कोटी अठरा लाख बत्तीस हजार फक्त) शासन निर्णय क्र.बीजीटी २६०६/प्र.क्र.४१६३/परा-४(२२) दिनांक २८ मार्च २००७, सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून पुस्तकी समायोजनेद्वारे म.रा.वि.वि.कं.मर्यादितला रक्कम प्राप्त झाली आहे.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे,संबंधित जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधीतानी जरुर ती कार्यवाही दि. ३१.३.२००७ अखेर असलेल्या थकबाकी पोटी करणे बंधनकारक आहे.

क्षेत्रीय कार्यालयाने कळविल्यानुसार दि. ३१.३.२००६ अखेरची थकबाकी व चालू वीज बीला पोटी (२००६-२००७) एकूण रुपये १२०.७२ कोटीचा मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता तदवत पुस्तकी समायोजनेव्दारे शासनाकडून रुपये १२०.७२ कोटी कंपनीस प्राप्त झालें आहेत म्हणजेच उपरोक्त प्राप्त रक्कम ग्रामपंचायत दिवाबत्ती पोटी समायोजित केल्यास दि. ३१.३.२००७ अखेर थकबाकी राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ३१.३.२००७ अखेर थकबाकी राहत असल्यास अथवा शासनाकडून प्राप्त रक्कम कमी अथवा जास्त राहत असल्यास संबंधित बाबीच्या खुलाश्यासह या कार्यालयास कळविण्यात यावे, जेणेकरुन शासनास २००७-०८ या वर्षाकरिताचा सुधारीत अंदाज सादर करणे शक्य होईल.

थकबाकीपोटी समायोजित करण्यात आलेल्या रकमेचे, (सन २००६-०७) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरीत पाठवावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

07/04/07

मुख्य अभियंता (वाणिज्य)

अर्थसंकल्पीय अनुदान सन २००६-२००७.

३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतींना १०० %अनुदान (३६०४०३२५)(दत्तमत)(मागणी क्र. एल -५)

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. बीजीटी २६०६/प्र.क्र. ४१६३ /पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक- २८ मार्च, २००७.

वाचा :-१) शासन निर्णय , ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दि . ३०.१.९०
२) शासन निर्णय क्र. बीजीटी २६०६/प्र.क्र. ४१६३ /पंरा-४(२२), दिनांक- २८ जुलै . २००६
३) शासन निर्णय क्र. बीजीटी २६०६/प्र.क्र. ४१६३ /पंरा-४(२२). दिनांक- ८ डिसेंबर , २००६

प्रस्तावना :-

ग्राम पंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने एकूण रुपये ११०,५४,००,०००/- ( रु एकशे दहा कोटी चौपन्न लक्ष फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. वित्त विभागाने सन २००६-२००७ या वर्षा करीता रुपये १२०,७२,००,०००/- (रुपये एकशे विस कोटी बहात्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेचे सुधारित अंदाज मान्य केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रु.११०,५४,००,०००/- (रुपये एकशे दहा कोटी चौपन्न लाख फक्त ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे. वित्त विभागाने सन २००६-२००७ या वर्षा करीता रुपये १२०,७२,००,०००/- (रुपये एकशे विस कोटी बहात्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेचे सुधारित अंदाज मान्य केले आहे.

२. सदर तरतूदीतून ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज देयके अदा करण्यासाठी संदर्भाधीन शासन समक्रमांकाच्या दिनांक २८ जुलै, २००६ च्या शासन निर्णयाव्दारे तरतूद रक्कम रुपये ५५,२७,००,०००/- (रुपये पंचावन्न कोटी सत्तावीस लाख फक्त ) व संदर्भाधीन शासन समक्रमांकाच्या दिनांक ८ डिसेंबर २००६ च्या शासन निर्णयाव्दारे तरतूद रक्कम रुपये ५५,२७,००,०००/- (रुपये पंचावन्न कोटी सत्तावीस लाख फक्त ) अशी मिळून एकूण रक्कम रुपये ११०,५४,००,०००/- (रुपये एकशे दहा कोटी चौपन्न लाख फक्त ) इतकी तरतूद आत्ता पर्यंत पुस्तकी समायोजनेव्दारे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला वितरित करण्यांत आली आहे

३. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने पत्र क्र. मु. अ ( वा ) /लेखा /दि.बा. पा. पु /३६६८६ दिनांक ७ ऑक्टोबर , २००६ अन्वये सन २००६-२००७ या आर्थिक वर्षांत मागील थकबाकीसह ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील दिवा बत्तीची वीज देयकांचे रुपये १२०,७२,००,०००/- चे सुधारित मागणीपत्र शासनास सादर केले आहे . आता या शासन निर्णया सोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविल्या प्रमाणे ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज देयके अदा करण्यासाठी उर्वरित सर्व तरतुद रक्कम रुपये १०,१८,३२,०००/- ( रुपये दहा कोटी अठरा लाख बत्तीस हजार फक्त ) पुस्तकी समायोजनेव्दारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला वितरित करण्यास मंजूरी देत आहे.

४. वास्तव या अनुदाना करिता सन २००६-२००७ या वर्षा करिता या शासन निर्णया सोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्रमांक ५ मध्ये दर्शविल्या प्रमाणे रक्कम रुपये १२०,७२,००,०००/- (रुपये एकशे विस कोटी बहात्तर लक्ष फक्त) इतके अंतिम सुधारित अनुदान समजण्यात यावे.

५. सदर अनुदान खालील अटी आणि शर्तींच्या अधिन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास पुस्तकी समायोजनेने मंजूर केलेली रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतींच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या सन २००६-२००७ मधील वीज देयकाची रक्कम समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा. सदर वीज देयकांची रक्कम योग्य असल्याचे स्वतंत्र पथक नेमून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने पडताळणी करणे आवश्यक आहे याकरिता संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांशी संपर्क साधून त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी .

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व विभागाच्या विभागीय आयुक्त यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे. तसेच समायोजित केलेल्या रकमेतून भागविलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील वीज देयकांचा ग्रामपंचायत निहाय सविस्तर तपशील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणे व त्यांच्याकडुन प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावी. व त्याची एक प्रत शासनास पाठवावी. विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र. ३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

५. वरील मंजूर रक्कम रुपये १०,१८,३२,०००/- (रुपये दहा कोटी अठरा लाख बत्तीस हजार फक्त) ही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास रोखीने न देता पुढे दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युतमंडळाकडून शासनास येणे असलेल्या रक्कमेपोटी वसूल करण्यात यावी व खाली नमूद केलेल्या जमा लेखाशीर्षा खाली पुस्तकी समायोजनेद्वारे जमा करण्यात यावी.

| अ. क्र. | तपशील | रक्कम | जमा लेखाशीर्ष |
|---|---|---|---|
| | वित्तीय वर्ष २००६-२००७ या वर्षातील विद्युत शुल्क रु. ८५१.५२ कोटीमधून या आदेशान्वये समायोजित करावयाची रक्कम रु. १०.१८३२ कोटी | रुपये १०,१८,३२,०००/- | ००४३ वीजेवरील कर व शुल्क, १०१- वीजेचा वापर व विक्री यावरील कर, (१) मुंबई विद्युत शुल्क अधिनियम १९५८ याखालील जमा रकमा (००४३००११) |
| | एकुण | रुपये १०,१८,३२,०००/- | |

६. सदर रकमांचे पुस्तकी समायोजन महालेखापाल, मुंबई १ यांचे अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने या रकमांचे देयक तयार करण्यात येवू नये.

७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई यांनी त्यांच्या अखत्यारित आणि अधिकारात वरील विवरणपत्रानुसार सदर रक्कम रु १०,१८,३२,०००/- ( रुपये दहा कोटी अठरा लाख बत्तीस हजार फक्त )चे पुस्तकी समायोजन करुन तसे शासनास कळवावे.

८. सदर खर्च ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे - २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची देणे रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल ५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २००६-२००७ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून समायोजित करण्यात यावा.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या खर्चानि १००६/प्र.क्र.१/अर्थोपाय , दिनांक २०.४.२००६ च्या परिपत्रकानुसार व या विभागाच्या कार्यासन वित्त १ च्या पत्र क्र. बीजीटी १००६/प्र.क्र.७०/वित्त -१, दिनांक

५ एप्रिल, २००६ तसेच त्यासंदर्भात उद्योग , उर्जा विभागाने ( उर्जा -३ ) त्यांच्या, दिनांक २६/३/२००७ च्या टिप्पणीन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(शि. प्र. राजपूरकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती )

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१ (५ प्रती)

२) मॅनेजिंग डायरेक्टर , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

३) मुख्य अभियंता ( वाणिज्य ) , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड (वाणिज्य विभाग ) ५ वा मजला , अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पू ) , मुंबई ४०० ०५१ (३ प्रती ) ( महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ०१ यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून या शासन निर्णयाप्रमाणे रक्कम समायोजित करुन घ्यावी, ही विनंती. )

४)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२ , नागपूर .

५).अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.

६)निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पर्व), मुंबई - ४०० ०५१.

७) निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

८) मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्रशासन, प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्णा चेंबुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

९) अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.(वरील शासन निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून कार्यवाही करुन घेण्यांत यावी, ही विनंती )

१०) विभागीय आयुक्त (सर्व)

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

१३) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत )

१४) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.

१५)उप मुख्य लेखा परिक्षक, नवीन मुंबई, वाशि/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.

१६) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग ( वित्त -१, वित्त- ७, वित्त -८ )

१७) कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.

१८) वित्त विभाग (अर्थसंकल्प १६ / व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.

१९) निवडनस्ती ,पंरा -४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

C:\Backup\ashhok ddrive\d22\gr\BUDGET 2006-07STREET LIGHT 416315

विवरणपत्र

शासन निर्णय क्र. : बीजीटी २६०६/प्र.क्र. [illegible] (विसं-४ (२२), दिनांक २८ मार्च, २००७ ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा [illegible] २०० इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा, [illegible] (०१) (०३) [illegible] दिव्यांची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतींना १०० % अनुदान (३६०४०३२१) [illegible] (मागणी क्र. एल -२)

रु. लाखात

| अ. क्र. | जिल्हा | वास्तव कृत २००६-२००७ या आर्थिक वर्षात आतापर्यन्त दिनांक २८ जुलै २००६ व दिनांक ८ डिसेंबर २००६ च्या शासन निर्णयान्वये पुस्तकी समायोजनाव्दारे वितरित करण्यांत आलेले एकूण अनुदान रुपये अंकी (लाखात) | या शासन निर्णयान्वये पुस्तकी समायोजनाव्दारे वितरित करण्यांत येत असलेले अनुदान रुपये अंकी (लाखात) | अंतिम सुधारित अनुदान रुपये अंकी (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ठाणे | ५०६.५९ | ७५.६९ | ५८२.२८ |
| २ | रायगड | ७२१.९५ | ९८.८३ | ८२०.७८ |
| ३ | रत्नागिरी | ७१.०८ | ७.९९ | ७९.०७ |
| ४ | सिंधुदुर्ग | ९३.६२ | १२.८७ | १०६.४९ |
| ५ | नाशिक | १२६.६३ | ०.०० | १२६.६३ |
| ६ | धुळे | ७२.५३ | ०.०० | ७२.५३ |
| ७ | नंदूरबार | ९८.८८ | ५.९९ | १०४.८७ |
| ८ | जळगांव | १५४९.१६ | १४३.३८ | १६९२.५४ |
| ९ | अहमदनगर | २८९.०३ | ०.०० | २८९.०३ |
| १० | पुणे | ३२१.३४ | १६.७१ | ३३८.०५ |
| ११ | सातारा | ३२०.९२ | ५.८४ | ३२६.७६ |
| १२ | सांगली | २४९.११ | ८.३२ | २५७.४३ |
| १३ | सोलापूर | ५३६.७६ | ४९.७१ | ५८६.४७ |
| १४ | कोल्हापूर | ४०६.०६ | २७.०५ | ४३३.११ |
| १५ | औरंगाबाद | ३३५.१२ | २०.८८ | ३५६.०० |
| १६ | जालना | २५९.९४ | ३४.०६ | २९४.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | परभणी | ६२५.०८ | ९४.३३ | ७१९.४१ |
| १८ | हिंगोली | ४६१.३३ | ६२.६४ | ५२३.९७ |
| १९ | बीड | ४०.१० | ०.०० | ४०.१० |
| २० | नांदेड | ४१९.०६ | ३४.८५ | ४५३.९१ |
| २१ | उस्मानाबाद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २२ | लातूर | २२५.०० | २.०५ | २२७.०५ |
| २३ | बुलढाणा | २५०.०६ | १३.३४ | २६३.४० |
| २४ | अकोला | ३८३.७६ | ४५.४४ | ४२९.२० |
| २५ | वाशिम | ६३५.१६ | ८६.७२ | ७२१.८८ |
| २६ | अमरावती | ५१०.२३ | ४९.२६ | ५५९.४९ |
| २७ | यवतमाळ | १२९.०५ | ०.०० | १२९.०५ |
| २८ | वर्धा | ३८८.५८ | ३.२० | ३९१.७८ |
| २९ | नागपूर | ४२६.०२ | ४७.०६ | ४७३.०८ |
| ३० | भंडारा | ८०.०९ | ०.०० | ८०.०९ |
| ३१ | गोंदिया | ९७.७१ | ११.२९ | १०९.०० |
| ३२ | चंद्रपूर | ५०१.२५ | ६०.९० | ५६२.१५ |
| ३३ | गडचिरोली | १२२.८० | ०.०० | १२२.८० |
| | सर्व एकूण | ११०५४.०० | १०१८.३२ | १२०७२.३२ |

(शि. प्र. राजपूरकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.